# प्रतीक रिबेलो याची बिटसेट परीक्षेत चमक


प्रतीक रिबेलो

पणजी, ता. २४ (प्रतिनिधी) : मुष्टीफंड आर्यन उच्च माध्यमिक विद्यालयाचा विद्यार्थी प्रतीक ऑस्कर रिबेलो याने बिटस पिलानी संस्थेच्या अभियांत्रिकी प्रवेश परीक्षेत उत्कृष्ट कामगिरी केली आहे.

बिटसेट परीक्षेत प्रतीक याला ४५० पैकी ४२६ गुण मिळवता आले असून यापूर्वी ४२३ गुण मिळवलेल्या आर्यनच्या रौनक साखरदांडे या विद्यार्थ्याचा विक्रम त्याने मोडला असल्याची माहिती मुष्टीफंड आर्यनचे प्राचार्य व्यंकटेश प्रभुदेसाई यांनी दिली.

प्रतीक याने मणिपाल इस्टिट्यूटच्या अभियांत्रिकी प्रवेश परीक्षेत देशात प्रथम स्थान प्राप्त केले आहे. मणिपालच्या प्रवेश परीक्षेचा निकाल अलीकडेच जाहीर झाला आहे. गोवा सीईटीत प्रथम आलेल्या प्रतीक याने बारावी परीक्षेतही चमकदार कामगिरी केली असून त्याने आयआयटी मेन्स परीक्षेतही चांगले गुण मिळवले आहेत.

Scanned by CamScanner